MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Vidyawarta®

Issue-21, Vol-07, Jan. to March 2018
International Multilingual Research Journal

ANNIVERSARY CELEBRATIONS
6th
ANNIVERSARY
2018

Editor
Dr.Bapu G.Gholap

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

31

# 'अस्मितादर्श' मधील साहित्यविषयक लेख (१९६८ ते ७८)

प्रा.सर्जेराव रणखांब
(मराठी विभाग)
देगलूर महाविद्यालय, देगलूर

**********

साहित्याचा विचार केंद्रभागी ठेवून या लेखांचा अभ्यास केला आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी स्थूलपणे दलित साहित्य, निग्रो साहित्य व एकूण साहित्यविषयक चर्चा असे भाग पाडलेले आहेत.

**दलित साहित्य :-**

१९६० नंतर मराठी साहित्यातील हा एक सशक्त वाड्मयीन प्रवाह आहे. वाड्मय प्रवाहाला बळकटी देण्याचे कार्य 'अस्मितादर्श' ने केले आहे. दलित साहित्याचे स्वरुप, जाणिवा व प्रेरणा या नियतकालिकाच्या वतीने दरवर्षी दलित लेखकांचे व विचारवंतांचे मेळावे भरविले जातात. त्यातूनही दलित साहित्याची सैध्दांतिक भूमिका आकाराला येत आहे. दोघांचाही परस्परांशिवाय विचार शक्य नाही. 'औरंगाबादहून डॉ.गंगाधर पानतावणे यांच्या संपादकत्वाखाली निघणारे हे 'अस्मितादर्श' हे त्रैमासिक दलित साहित्याच्या प्रचार प्रसारालाच वाहिलेले आहे.'१ या विधानातून अस्मितादर्शची भूमिका स्पष्ट होते. आजचे अनेक दलित लेखक अस्मितादर्शमधूनच उदयास आले आहेत. एकूणच ललित लेखनाबरोबरच वैचारिक साहित्याचे संस्कार करण्याचे कामही या नियतकालिकाने हाती घेतलेले आहे. नववाड्मयीन प्रेरणा व प्रवृत्ती यांस समग्रपणे बळ देण्याचे काम अस्मितादर्श आजही जोमाने करते आहे.

शतकानुशतके ज्यांचे माणूसपण नाकारले गेले, वर्णव्यवस्थेच्या विळख्यात जो भरडला गेला तो दलित साहित्याचा केंद्रबिंदू आहे. 'माणसाच्या मुक्तीचा पुरस्कार करणारे, माणसाला महान मानणारे वंश, वर्ण आणि जातिश्रेष्ठत्वाला कठोर विरोध करणारे जे साहित्य असते ते दलित साहित्य'.२ यावरुन दलित साहित्याची भूमिका कळते. डॉ.आंबेडकरांच्यापूर्वी दलितसमाज काळोखात होता त्यांच्यामुळे या समाजाला प्रकाश मिळाला. आत्मभानामुळे दलित आपल्या व्यथा मांडू लागले. या व्यथा मराठी साहित्यात पूर्वी सहानुभूतीशिवाय अधोरेखित झाल्या नव्हत्या. अस्पृश्यता, दास्य, विषमता आणि दु:ख या गोष्टींशी दलित साहित्याचे वैर आहे म्हणून 'दलित साहित्य म्हणजे सूडवाद्याचे साहित्य नाही. दलित साहित्य माणसाच्या महतीचा आणि मुक्तीचा प्रथम पुरस्कार करते आणि ते एक ऐतिहासिक गरजही आहे म्हणून स्वत:ला वेगळे नाव धारण करते'.३ असे अस्मितादर्शमधून सूचित होताना दिसते.

'साहित्य' या शब्दाचीच पुरेशी व्यापक अशी व्याख्या अजून झाली नाही. म्हणून दलित साहित्याची व्याख्या करणे तितकेच कठीण आहे. पण एक खरे की, दलित समाज व दलित साहित्य यांचा अतूट संबंध आहे. म्हणून या साहित्याच्या स्वरुपाविषयी 'दलित साहित्य ही संज्ञा प्रश्नवाचक आणि प्रश्नसूचक आहे. त्या साहित्यात जो आशय व्यक्त होताना दिसत आहे. त्याचे स्वरुप मुख्यत: वंशवाद, भांडवलवदार विरोधी आहे'.४ अशी भूमिकाही घेतलेली दिसून येते.

या साहित्याला दलित, बौध्द अशाही संज्ञा अस्मितादर्शमधून वापरल्या गेल्या आहेत. काहींनी आपआपल्या भूमिकेनुसार या संज्ञाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केलेला आहे. डॉ.एलिनार झेलियट यांना बौध्द साहित्यापेक्षा दलित साहित्य हा शब्द अधिक अर्थपूर्ण वाटतो. महाराष्ट्रात या साहित्याचा पहिला उद्‌गार चोखामेळ्याने काढलेला दिसून येतो. कोणत्याही साहित्याला एक परंपरा असते. दलित साहित्य हिंदू धर्माची परंपरा नाकारते मात्र हे संपूर्ण साहित्य मानवी परंपरा नाकारु शकत नाही. दलित साहित्य भूतकाळातील समग्र प्रवृत्तीला नाकारते. म्हणजे त्याला वाटत असलेले दोष नाकारते. 'मराठीचे साहित्यशास्त्र, काव्य कादंबरी आणि इतर साहित्यप्रकार यांचा दलित साहित्याशी संबंध आहे. म्हणजेच नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ, फ.मु.शिंदे, शशिकांत लोखंडे आदी कवी मंडळी आणि बाबूराव बागल, खरात आदी लेखक मंडळींचा नवकाव्य आणि नवकथेशी कोणत्याही अदालित लेखकाइतकाच अनिवार्य संबंध आहे'.५ यावरून त्याची प्रचिती येते. दलित साहित्याची निर्मिती ही मराठी साहित्यातील क्रांतिकारक घटना असली तरी ती मराठीच्या विरोधी नाही. मराठीच्या कक्षा विकसित करणारी ही साहित्य प्रणाली आहे. म्हणूनच मराठी साहित्यांतर्गत दलित साहित्य एक गतिशील घटना आहे. तिच्यामुळे मराठी साहित्याची परंपरा मोडण्याऐवजी वाढली जाणार आहे. स्वत: दलित लेखकांची इच्छा असो वा नसो. दलित लेखकही या परंपरेलाच समृध्द करणार आहेत. जसा सूर लक्षात येतो. कारण कोणतेही साहित्य मानवी जीवनाचा पडसाद असावे अशी अपेक्षा असते म्हणून माणूस हा दलित साहित्याच्या अग्रस्थानी आहे. व्यवस्थेने कोंडी केलेल्या माणसाला मुक्त करु पाहणारे हे साहित्य आहे ते माणसाला महान मानते. माणसाच्या भावना म्हणजे या साहित्याचे महान ऋतू आहेत.

ही दलित साहित्याची मानवी जाणीव आहे याची प्रचीती अस्मितादर्शमधील लेखातून येते.

'महाराष्ट्र बौध्द साहित्य संमेलन' महाड येथे भरलेले होते. या संमेलनातून प्रा.वा.ल.कुलकर्णी, बाबूराव बागूल, म.भि.चिटणीस यांचे या साहित्याविषयीचे विचार अस्मितादर्शमधून प्रकाशित झाले आहेत. अर्वाचीन मराठी साहित्यापेक्षा वेगळ्या प्रकारचे साहित्य गेल्या काही वर्षांपासून मराठीत निर्माण होत आहे. याचा तोंडवळा वेगळा आहे. प्रकृती, प्रेरणा वेगळ्या आहेत. एक प्रचंड समाज या निमित्ताने जागा होत आहे हा वेगळा सवतासुभा नाही. तर हे साहित्य मराठी साहित्याचं दालन समृध्द करणारं आहे असे त्यांनी आपल्या भाषणातून नमूद केलेले आढळून येते. पुढे ते दलित साहित्यिकांना मार्गदर्शन करताना म्हणतात, 'आपणाला हरिभाऊ खाडिलकरांसारखे बोलता येणार नाही. त्याचा विचार करू नका'. 'form' चा विचार करू नका, शैलीचा विचार करावयाची गरज नाही 'facts' मध्ये दुबळे असलेले मराठी साहित्य तुम्ही संपन्न करणार आहात'.६ 'नाटकीपणा, वेडगीपणा, अतिरंजीतपणा यामुळे मराठी साहित्य विलक्षण उच्च होत आहे' याला सुधारण्यासाठी दलित साहित्याची गरज आहे असे सूचित केलेले आहे. दलित साहित्यिकांनी लिहिलेल्या ललित साहित्याला वैचारिक साहित्याची जोड देता आली पाहिजे. वैचारिक साहित्य निर्माण झाले नाही तर ललित साहित्य दुबळे ठरण्याची शक्यताही त्यांनी वर्तवली आहे.

या संमेलनातील परिसंवादातून 'दलित साहित्याच्या जाणिवा व प्रेरणा' या विषयी अभ्यासकांनी जे विचार मांडले आहेत ते सूत्ररुपाने खालीलप्रमाणे आहेत.

'जीवनाचा हुंकार साहित्यातून येतो म्हणून दलितांचे साहित्य व पांढरपेशाचं साहित्य असे वेगळे भाग करता येणार नाहीत. दलित साहित्याची प्रेरणा आहे, डॉ.बाबासाहेबांनी दिलेली माणुसकीची जाणीव. त्यामुळे दलित साहित्य संकुचित तर नाहीच किंवा त्याच्या प्रेरणा निग्रो साहित्यावरही आधारलेल्या नाहीत.'-(झुंबरलाल कांबळे-अस्मितादर्श मार्च-१९७१ पृ.५१)

'दलितांच्या जाणिवा व प्रेरणा त्यांनी स्वतः निर्माण केलेल्या असल्यामुळे त्या अव्हेरता येण्यासारख्या नाहीत त्यांची खूप पिळवणूक झालेली आहे त्यामुळे ते आवेगाने व आवेशाने आज साहित्य निर्माण करीत आहेत'.(प्र.श्री नेसरकर आदर्श मार्च-१९७१, पृ.५१)

'संता वाड्मयाचा नायक देव आहे. परंतु आम्हाला आमच्या साहित्यात माणसाला नायकत्व द्यावयाचे आहे. हा लढा जागतिक साहित्यात माणसाची बाजू घेणारा राहील. ते साहित्य माणसाच्या मुक्तीचा पुरस्कार करणारे वंश, वर्ण, जातिश्रेष्ठत्वाला कठोर विरोध करणारे असे राहील'.(बाबूराव बागूल आदर्श, मार्च ७१, पृ.५१)

'आजवर आपलं खरंखुरं चित्रण साहित्यात झालेलं नाही. आम्हाला साहित्यात मोलाची भर टाकावयाची असेल तर बाबासाहेबांच्या प्रेरणा घ्यायला हवेत'. (श्री हरिभाऊ पगारे-अस्मितादर्श १९७१, मार्च पृ.५१)

'हे आत्ममुक्तीचं आंदोलन आहे. हा जो विचार आहे तो बाबासाहेबांचा आहे. हे मला मान्य आहे. पण ही आत्ममुक्तीची चळवळ धार्मिक आहे की सामाजिक.... आज आर्थिक जीवनाचा विचारच केला जात नाही. येथे मनुप्रणीत व्यवस्था व आर्थिक व्यवस्था यांची गाठ बांधली गेली आहे म्हणून...., नुसती आत्ममुक्तीची घोषणा करुन भागणार नाही तर आर्थिक वर्णव्यवस्थेचा विचार करावयाला पाहिजे'. (प्रा.सुभाष सोमण-(अस्मितादर्श, मार्च-७१, पृ.५२)

'या देशाला जातियतेचा फार मोठा शाप आहे. रशियात मार्क्स क्रांती करु शकतो कारण तिथे जाती नाहीत. भारतात मार्क्स करु शकत नाही. येथे नुसत्या आर्थिक व्यवस्थेचा विचार करुन भागणार नाही. तर डॉ.बाबासाहेबांचा विचार व मार्क्सचा विचार म्हणजेच सामाजिक व आर्थिक प्रश्नांची सांगड घालावी लागेल विद्रोहाच्या नावाखाली जे लिहिले जाते ते दलित साहित्य नव्हेच, तर दलित साहित्याला मार्क्सवाद व आंबेडकरवादाच्या समन्वयाची गरज आहे'. (रावसाहेब कसबे (अस्मितादर्श, मार्च-७१, पृ.५२)

'बहुजनांचे दुःख अक्षरबध्द करणारे, बहुजनांच्या वृत्ती-प्रवृत्ती त्यातून व्यक्त होणारे ते साहित्य असेल खऱ्या अर्थाने ते वाड्मय बहुजननिष्ठ झाले पाहिजे'. (सदा कऱ्हाडे (अस्मितादर्श, मार्च-७१, पृ.५२)

आपल्या अध्यक्षीय भाषणातून य.भि.चिटणिसांनी बाबासाहेबप्रणित बौध्द धम्म ही दलितवर्गीय लेखकांना प्रेरक शक्ती ही प्रवृत्ती दलितात निर्माण होऊ लागली आहे. आदी गोष्टींचा उहापोह केलेला आहे.

दलित साहित्याच्या जाणिवेत व प्रेरणेत वर्णवादाला, जातिनेष्ठ्त्वाला विरोध आहे. माणूसपणाची जाण आहे. त्याच्या मुक्तीचा पुरस्कार आहे. कोणत्याही शक्तीने माणसांवर गुलामीची वेळ आणून त्याचे मनुष्यत्व नाकारणे हे या साहित्याला पसंत नाही. माणसाला आदराचे स्थान देणारे जे म्हणून काही विचार आहेत त्यामध्ये भगवान बुध्द, महात्मा फुले, डॉ.आंबेडकर यांचाही समावेश आहे. शिवाय पुरोगामी चळवळींचा स्त्रोत हा सुध्दा दलित साहित्याच्या प्रेरणेला बळकटी देणारा, प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करणारा आहे. याचीही नोंद घ्यावी लागते.

शरच्चंद्र मुक्तिबोध यांनी दलित वाड्मय : एक विचार

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
UGC Approved Jr.No.62759
Vidyawarta®
Jan. To March 2018
Issue-21, Vol-07
0134

अस्मितादर्श दिवाळी अंक १९७१) या लेखात दलित साहित्याची सांगोपांग चर्चा केली आहे. दलित चळवळीविषयी ते म्हणतात 'पूर्वी पुरोगामी लेखकाची चळवळ, महाराष्ट्रापुरते बोलावयाचे झाल्यात, कलावंतांची स्वयंस्फूर्त होऊ शकली नाही, तर जायची दलित वाड्मयाची चळवळ ही मात्र स्वतः लेखकांनी व कवींनी स्वयंस्फूर्तीने चालविलेली चळवळ आहे, निर्मात्याची चळवळ आहे'७. दलित लेखकांची जाणीव संकुचित नसून ती मूल्यगर्भ व अन्य लेखकापेक्षा वैशिष्ट्यपूर्ण आहे. ही चळवळ दलित लेखकांची सृजनशील कलावंताची चळवळ आहे असे त्यांनी आपल्या लेखातून अधोरेखित केले आहे. दलित लेखकांची जाणीव बाह्य जीवनातील व मनोजीवनातील विसंगतीचा प्रत्यय जाणून देणारी मूल्यगर्भ व प्रामाणिक आहे. अस्सल भारतीय जीवनाचे समर्थ चित्रण करा यामुळे रेखाटले जाऊ शकेल. भारतीय पातळीवरील तो मानवतेचा उद्‌गार आहे. पुरोगामित्वाला विरोध करणारी ही जाणीव नसून त्याचाच तो एक स्वतंत्र उन्मेष आहे, असे प्रस्तुत लेखकाला वाटते.

दलित लेखकाच्या जाणिवेला अधिक प्रगल्भता येण्यासाठी व परिणाम येण्यासाठी मुक्तिबोधांनी, दलित लेखकांनी निग्रो वाड्मयाच्या जोडीला युरोपीय, रशियन, अमेरिकन अशा थोर वास्तववादी वाड्मयसेवकांचे वाड्मय आत्मसात करणे योग्य आहे असे आपल्या लेखाच्या शेवटी प्रतिपादन केले आहे. अनुभवाचे स्वरुप व पोत अधिक सखोल व रेखीव करण्यासाठी ही परंपरा त्यांना दलित लेखकांच्या संदर्भात महत्वाची वाटते.

'समाजापुढे येणारी कलाकृती ज्या एका खास मातीतून निर्माण होते तिथले सर्वस्व कणाकणाने घेऊन येते. तिथले शोषण संपल्यानंतर ती आस्वादासाठी मुक्त होते'८ याप्रमाणेच दलित साहित्य आजपर्यंत कोंडलेल्या जीवनाला प्रवाहाच्या रुपाने वाट काढून देते आहे आणि या प्रवाहात मराठी सत्वाची, वास्तवाची नवनवीन बीजं आहेत हेही तितकेच सत्य आहे.

**वेदना, विद्रोह आणि नकार : दलित साहित्य :-**

वेदना, विद्रोह आणि नकार या त्रयीतून दलित साहित्याचा उगम झालेला आहे. जो समाज प्राण्यावर पक्ष्यांवर, दगडावर प्रेम करतो तो माणसाला माणूसपणाची वागणूक देत नाही. त्यांचे माणूसपण अव्हेरुन त्यांना आपला दास करतो. ही अन्याय, अपमानाची व विषमतेची खंत वेदनेच्या रुपाने दलित साहित्यात उभी आहे.

'विद्रोह' चे स्वरुप प्रा.रा.ग.जाधव यांच्या लेखात सापडते (विद्रोही साहित्य कोणासाठी अवतरते जाफेना १९७३) विद्रोही साहित्य कोणासाठी लिहिले जाते, याचे उत्तर प्रस्तुत लेखात सुचविले आहे. 'विद्रोही साहित्याचे ध्येय समाजाच्या अपराधी मनाची (गिल्टी कॉन्शन्स) अभिव्यक्ती करणे हे असते'९. असे सांगून विद्रोही साहित्य हे विद्रोह किंवा विद्रोह विषय झालेल्या समाजालाही उद्देशून असते असे सुचविले आहे. विद्रोही साहित्य फक्त एकाच समाजासाठी नसते तर कोणतीही वाड्मयीन अभिव्यक्ती ही एका वैश्विक वाचकासाठी व वैश्विक काळासाठी जन्मलेली असते असेही म्हटले जाते.

मराठी विद्रोही साहित्य हे अल्पसंख्य दलितांच्या अनुभवांचे साहित्य आहे. या विद्रोहात पीडित समाजाच्या व्यथावेदनांची चित्रे आहेत किंवा हाच त्याचा मुख्य आशय असतो. विद्रोह हा फक्त एका समाजाचा भाग नसून हा भाग दोघांचाही म्हणजेच विद्रोही समाजाचा व ज्यांच्याबद्दल विद्रोह आहे, त्या समाजाचाही भाग आहे. या दोहोंतील संघर्ष समजावून घेणे विद्राह्य समाजाचे कर्तव्य आहे. म्हणून परस्परपोषक समाज निर्माण करावयाचा असेल तर विद्रोही साहित्य हे एकमार्गी वाहतूक मानणे चुकीचे आहे. या तर दोन्ही वर्गांच्या रहदारीसाठीच अवतरत असतात असे प्रा.रा.ग.जाधवांनी प्रस्तुत लेखांत म्हटले आहे.

'विद्रोही साहित्य आत्माविष्कारासाठी निर्माण होते, तसेच ते सामाजिक परिवर्तनाच्या उद्वेगांनाही निर्माण होते किंबहुना एकाच वाड्मयीन आविष्काराच्या मुळाशी वरील उद्दिष्टे असू शकतात'.१० म्हणून आत्माविषकार व परिवर्तन या दोन्ही भूमिका विद्रोहाच्या तळाशी असतात आपण दलित साहित्यातील विद्रोहसुध्दा याच स्वरुपाचा आहेङ 'विद्रोह म्हणजे द्वेष नव्हे. विद्रोह म्हणजे बंड दलित लेखकांचा विद्रोह आहे तो प्रस्थापित साहित्यिक व नैतिक मूल्याविरुध्द, कलेसाठी कला, विरुध्द सनातन रुढी परंपरा जातिविरुध्द. पण हा विद्रोह समाजाभिन्मुखत्व असल्यामुळे द्वेषावर आधारलेल्या नसल्यामुळे वांझ नाही. त्याचा गाभा आहे सामाजिक जाणिवा'.११ यावरुन याची प्रचीती येईल.

जे साहित्य नवीन मूल्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करते ते जून्या मूल्यांचे दोष स्पष्ट करुन त्याला अव्हेरत असते दलित साहित्याचा नकारसुध्दा असाच आहे. वेदना, विद्रोह आणि नकार या चिरकालीन प्रेरणा घटकावर हे साहित्य आधारभूत आहे. या संदर्भातच अस्मितादर्शमधील लेखातून भूमिका स्पष्ट झाली आहे. ज्या भारतीय परंपरेने संस्कृतीनं साहित्यानं किंवा भारतीय वैचारिकतेनं दलितांना दाबून ठेवलं. या सर्व घटकांना हे साहित्य नकार देत आहे. हा नकार दलितांच्या जीवनातूनच साहित्यात आला आहे. दलितांचे भिन्न अनुभवविश्व आहे, गावकुसाबाहेरचं जग अज्ञान, दारिद्र्य, अवहेलना अशी कुचंबना त्यांच्या वाटेला आली आहे. मुळातच या संस्कृतीनं आपल्याला नाकारलं आहे ही जन्मसिध्द जाणीव दलितांच्या ठिकाणी निर्माण झाली आहे. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व आर्थिक

आदी संमिश्र दबावातून जी परिस्थिती माणसाला जगण्याचे सारे आधारच नाकारते त्या एकूण परिस्थितीलाच हे साहित्य नाकारत आहे.

नकाराची परंपरा व त्याला सैध्दांतिक स्वरूप आणून देण्याचा प्रयत्न काही लेखात झालेला दिसून येतो. त्याचे स्वरुप 'दलितांच्या हजारो वर्षांच्या मानसिक जडणघडणीतून जी वैचारिकता उदय पावली तिचे आंबेडकरी विचार निर्णायक प्रतिनिधित्व करतात. म्हणून नकार आणि आंबेडकरवाद यांचा अन्योन्य संबंध आहे. नकार हा आंबेडकरी विचार दर्शनाचाच एक भाग आहे.'१२ या विधानावरुन लक्षात येते व नकाराच्या तळाशी असणारी ही जीवनमूल्यात्मकता आंबेडकरवादाशी नाते सांगताना दिसून येते.

त्र्यं.वि.सरदेशमुख यांनी आपल्या लेखातून विद्रोहाविषयी म्हटले आहे की, 'वाङ्मयीन विद्रोह हा गतिमान व्यक्तिमत्वाचा, प्रस्थापित, जडशीळ झालेल्या जीवनाविरुध्द विद्वेष व आघात असतो. गतीला रुध्द करणाऱ्या जड शक्तीची मात होते तेव्हा एक प्रचंड अस्ताव्यस्त, कुरूप, रुग्ण कुचंबळेपण सर्वत्र साचते. ते फोडावे व विद्रोही मनाची आकांक्षा असते.'१३ विद्रोहाचे आणि साहित्याचे नाते तसे नवे नाही युगायुगातून विद्रोहाचे स्वर कमी-अधिक प्रभावाने उमटले आहे, अशा प्रकारे वेदना, विद्रोह व नकार यांची पार्श्वभूमी लक्षात घेता येते.

मराठी साहित्यातून दलित उपेक्षितांचे चित्रण हे उपेक्षित पध्दतीचे आहे म्हणून दलित साहित्य हेतूप्रेरित वाटचाल करते आहे. या वाटचालीमध्ये दलित साहित्याची वेदना वेगळी आणि तीव्र आहे. नव्या जीवनाचे नवे दर्शन घडवीत दलित साहित्य हे आंतरजीवनातले तणाव आणि ताण आविष्कृत करीत आहे. अस्मितेचा स्वतंत्र आरसा त्यामुळे दलित साहित्यांनी पुरवला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. अस्मितादर्शमधील परिसंवादातून अशाच प्रकारचे विचार प्रकट झालेले आहेत.

अस्मितादर्शचा (ऑ-नो-डि १९७५) च्या अंकातील प्रा.गं.बा.सरदार व डॉ.प्रभाकर मांडे यांचे दलित साहित्यावरील लेख ही अभ्यासनीय आहेत. प्रा.सरदारांनी आपल्या लेखातून संताच्या कार्यांची चिकित्सा, आजच्या दलित समस्येची चिकित्सा व दलित साहित्याकडे स्वागतशील नजरेने पाहिलेले आहे ते दलित साहित्याच्या वेगळेपणाची आज गरज असली तरी भारतीय समाज ज्यावेळेस एकात्म बनेल त्यावेळेस मग या साहित्याच्या स्वतंत्र अस्तित्वाचे प्रयोजन नाही असे सुचविले आहे. भारतीय समाजात केवळ दलितांचे शैक्षणिक मागासलेपण व आर्थिक दैन्यावस्था न मानता आपल्या धर्मविचारातील पाखंडीपणाला त्यांनी जबाबदार धरलेले आहे.

'दलित म्हणजे एक विशिष्ट सामाजिक स्थिती अनुभवित असलेला समूह किंवा समाजगट.'१४ भारतातील समाजव्यवस्थेत या शब्दाला विशिष्ट अर्थ प्राप्त झालेला आहे. अर्थात सामाजिक, धार्मिक, आर्थिक असा निरनिराळा आशय यात समाविष्ट आहे म्हणून दलित साहित्य हे अशा समाजगटातील व्यक्तींच्या अनुभवांना अभिव्यक्त करणारे असते. असे डॉ.प्रभाकर मांडे यांचे मत आहे. त्यांनी या लेखातून दलित साहित्यातील अनुभवाचे स्वरूप, दलित साहित्याचे निराळेपण याची मीमांसा केली आहे. अनुभवांविषयी म्हणतात, हे साहित्य व्यक्तिनिर्मित असले तरी त्या व्यक्तींच्या मनाचे निराळेपण त्या साहित्यातून प्रकट होण्याऐवजी समाजगटाच्या अनुभवाचे निराळेपण त्यातून विशेषत्वाने जाणवते'.१५

दलित साहित्याच्या संदर्भात जाणकारांच्या भूमिका वरील विवेचनाने लक्षात येतात.

संदर्भ :

१) कुलकर्णी गो.म.पुंडलिक विद्याधर, दलित साहित्य सामाजिक व सांस्कृतिक -२.
२) वागूल वाबूराव, अध्यक्षीय भाषण-अस्मितादर्श. मार्च १९७१ पृ.४२.
३) बागूल बाबूराव, दलित साहित्य आणि चळवळ-अस्मितादर्श. १९७३ पृ.७३
४) इंगळे वामन-दलित साहित्य आणि चळवळ-अस्मितादर्श, १९७३, पृ.७
५) कुलकर्णी वा.ल.अस्मितादर्श, मार्च १९७१ पृ. ४१, ४२
६) मुक्तिबोध शरच्चंद्र-दलित वाङ्मय : एक विचार-अस्मितादर्श दिवाळी ७१ पृ.३
७) मेश्राम केशव-दलित साहित्य: काही विचार (अंक १ पृ.४)
८) जाधव रा.ग.विद्रोही साहित्य कोणासाठी अवतरते-अस्मितादर्श, अंक ३ पृ.५
९) जाधव रा.ग.विद्रोही साहित्य कोणासाठी अवतरते-अस्मितादर्श, अंक-३, पृ.५
१०) वानखेडे, म.ना.मराठी साहित्यातील बंड-(दिवाळी अंक १९७०) पृ.१४०
११) रणधीर उमाकांत, नकार : 'दलित साहित्याच्या चिरकालीन प्रेरणा पटल', पृ.१३.
१२) सरदेशमुख त्र्य.वि.तारुण्य विद्रोह आणि साहित्य अस्मितादर्श, अंक १, पृ.९
१३) मांडे प्रभाकर-'दलित साहित्याचे निराळेपण'अस्मितादर्श अनों.दि.७५, अंक ४, पृ.७.
१४) मांडे प्रभाकर-'दलित साहित्याचे निराळेपण' अस्मितादर्श अनों.दि.७५, अंक ४, पृ.७.

□□□



Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist Nanded